# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र-०२** **दिनांक: ०१/०१/२०२४**

## बिल्डर यांच्यावर तलवारीने जिवघेणा हल्ला करुन खंडणी मागणा-या मकोका गुन्हयातील मुख्य आरोपीत यास वाराणसी, उत्तरप्रदेश येथुन ताब्यात घेण्यास पोलीसांना यश

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत फिर्यादी यांची दिनांक २१/०६/२०२३ रोजी त्यांचे बिंदशक्ती रिअल एस्टेट ॲण्ड इम्फ्रा, प्रायवेट लिमिटेड, ऑफीस ज्युचंद्र गाव नायगाव पुर्व या ऑफीसमध्ये असताना आरोपीत नाम गिरीश नायर व साथीदार हे हातात तलवार व लोखंडी रॉडसह गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी यांचे कार्यालयात घुसुन कार्यालयाची तोडफोड करुन फिर्यादी यांचेकडे मागतिलले खंडणीचे पैसे दिले नाही म्हणुन फिर्यादी यांचे ऑफिसमध्ये काम करीत असलेले साथीदार यांचे डोक्यात जिवे ठार मारण्याचे उद्देशाने तलवारीने वार करुन जखमी केले तसेच फिर्यादी यांचे पायावर तलवारीने वार करुन फिर्यादी व साक्षीदार यांना जिवत ठेवणार नाही अशी धमकी देवुन शिवीगाळ केलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नायगाव पोलीस ठाणे गून्हा रजि नं I १५५/२०२३ भा.दं.वि.सं.कलम- ३०७, ३८६, ४५२, १४३, १४७, १४८, १४९, ४२७, ५०४, ५०६ सह हत्यार बंदि कायदा कलम ४,२५ सह महाराष्ट्र पोलीस अधि १३५ प्रमाणे. गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाचा प्राथामिक तपास सहा.पोलीस निरीक्षक श्री बलराम पालकर नेमणुक नायगाव पोलीस ठाणे यांनी करुन तपासात (१) सुनील बाबु भोईर (२) प्रतीक संतोष जोशी (३) सुमीत प्रमोद भराऊत व (४) रोहीत सुरेश सोनटक्के या आरोपीतांना अटक केली. तपासात सदरचा गुन्हा हा टोळीप्रमुख गिरीश कुमारन नायर रा.विरार याने त्याचे उर्वरीत अटक व पाहीजे आरोपीतांचे मदतीने कट रचुन केल्याचे निष्पन्न झाल्याने अन्वेषण अधिकारी यांनी प्रस्तुत गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१),३(२),३(४)प्रमाणे वाढवुन लावण्याकामी सक्षम अधिकारी तथा मा.अपर पोलीस आयुक्त,मिरा भाईंदर, वसई विरार यांना अहवाल सादर केला असता त्यांनी आरोपीतांचा संघटीत गुन्हेगारीचा अभिलेख व तपासात उपलब्ध झालेल्या पुराव्यांचे आधारे महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियमानुसार कारवाई करणेकामी मंजुरी दिल्याने दिनांक १२/०८/२०२३ रोजी सदरचा गुन्हा पुढील तपासकामी श्रीमती पद्मजा बढे, सहा.पोलीस आयुक्त, वसई विभाग यांच्याकडे देण्यात आला होता.

श्रीमती पद्मजा बढे, सहा.पोलीस आयुक्त, वसई यांनी गुन्हयाचा मुख्य सुत्रधार व टोळीप्रमुख गिरीश कुमारन नायर यास मुंबई येथुन ताब्यात घेवुन अटक केली आहे. त्याचेवर खुन, खंडणीसाठी कट रचुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, गृहअतिक्रमण, प्राणघातक शस्त्रांनिशी दरोडा टाकणे, विनयभंग, गर्दी, मारामारी,प्राणघातक हत्यारांनिशी गंभीर दुखापत करणे, जबरी चोरी फसवणुक व अपहार करणे यासारखे गंभीर स्वरुपाचे १२ गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.त्यानंतर गुन्हयाचा सातत्याने तपास चालु ठेवुन गुन्हयातील पाहीजे आरोपीत रुपेश वसंत शिंदे, प्रथमेश हरिष दळवी, अमन विजय मांजरेकर, रोहन राजेंद्र जावीर व आकाश ऊर्फ श्रीधर गोटया जाधव यांना निष्पन्न करुन, सबळ पुराव्याअंती त्यांना अटक केली आहे.

गुन्हयातील मुख्य आरोपी गिरीष नायर यांचा मुख्य साथीदार आरोपी आकाश ऊर्फ श्रीधर गोटया जाधव हा सदरचा गुन्हा दाखल झाल्यापासुन फरार होता. सदर आरोपीत नामे आकाश ऊर्फ श्रीधर गोटया जाधव यांचा अभिलेख पडताळता त्याचे विरोधकात खुन, खुनाचा प्रयत्न, बलात्कार यासारखे १० गंभीर गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले. सदर गुन्हयातील पाहिजे आरोपीत नामे आकाश ऊर्फ श्रीधर गोटया जाधव हा गुन्हा केल्यापासुन वेगवेगळया जागा बदलुन राहत होता.

सदर गुन्हयातील पाहिले आरोपी नामे आकाश ऊर्फ श्रीधर गोटया जाधव हा गुन्हयातील मुख्य आरोपीत असल्याने सदर आरोपीत यांचा शोध घेण्याकामी मा. अप्पर पोलीस आयुक्त सो, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय व मा. पोलीस उप-आयुक्त सो, परिमंडळ नं ०२, वसई यांच्या मार्गदर्शनाखाली मा. सहाय्यक पोलीस आयुक्त सो, वसई विभाग वसई व प्रभारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली दोन वेगवेगळे पथके बनवुन त्यांचा मुंबई परिसरात शोध घेत असताना गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे आकाश ऊर्फ श्रीधर गोटया जाधव हा तांत्रीक विश्लेषन व गुन्हयातील अटक आरोपीत यांच्याकडे केलेल्या कौशल्यपुर्ण तपासाच्या आधारे तो वाराणसी,उत्तर प्रदेश येथे असल्याची माहीती मिळाल्याने नायगाव पोलीस ठाण्यातील एक पथक बनवुन अत्यंत कौशल्यपुर्णरित्या त्यास एस.टी.एफ.वाराणसी मदतीने ताब्यात घेवुन दिनांक १४/१२/२०२३ रोजी अटक केली आहे. यापुर्व गुन्हयातील अटक आरोपीतांकडुन अदयाप पावेतो ०२,०९,७००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल ज्यात,तलवारी,लाकडी दांडके,०२ मोटार सायकली व इतर असा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, मा.पोलीस आयुक्त, श्री.श्रीकांत पाठक,मा.अपर पोलीस आयुक्त व श्रीमती पार्णिमा चौगुले, मा.पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ०२,वसई यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली श्रीमती पद्मजा बढे, सहा.पोलीस आयुक्त, वसई विभाग, नायगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्री रमेश भामे, पोलीस निरीक्षक श्री टिळेकर, सहा.पोलीस निरीक्षक श्री पालकर, सहा.पोलीस निरीक्षक श्री केकाण, सहा.पोलीस निरीक्षक श्री देवरे, पोलीस उप निरीक्षक श्री वाघमोडे, पोलीस हवालदार कांगणे, नितीन जाधव, डावरे, देविदास पाटील, म.पो.हवा.शिर्के, पोलीस अंमलदार चेतन ठाकरे,जयवंत खांडवी, खाडे, अशोक पाटील,पोलीस अंमलदार सचिन खताळ, सचिन मोहीते, अमर पवार, राहुल भोये, म.सु.ब.चंदनशिव, क्षीरसागर व जाधव यांनी तसेच पोहवा/बागुल, पोलीस अमंलदार अमोल बरडे नेमणुक-मा.पोलीस उप आयुक्त परीमंडळ ०२,वसई कार्यालय यांनी केली आहे. सरकारी वकील श्री मोरे, विशेष तथा मोक्का न्यायालय, ठाणे यांचे न्यायालयीन कामासाठी विशेष सहकार्य मिळाले आहे.